# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव





# विज्ञान विहार





सामर्थ्यशाली व सर्वार्थाने सक्षम समाज ही देशाची खरी क्षमता व शक्ती असते. असा समाज उभा करण्याची व विकसित करण्याची नैतिक जबाबदारी शिक्षणसंस्था व मुख्यत: विद्यापीठांची असते. सर्वांगाने विकसित नागरिक घडविण्यासाठी औपचारिक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व आणि गरज आधुनिक समाजाला उमगली आहे. चाकोरीबद्ध शिक्षणापेक्षा अनुभुतीतून मिळणारे शिक्षण माणसाला अधिक सक्षम व वस्तुनिष्ठ बनविते यांची जाणीव झालेली आहे. व्याख्यानापेक्षा चित्ररुपाने व चित्ररुपांपेक्षा वस्तुची प्रत्यक्ष प्रतिकृती दाखवून ज्ञान लवकर पोहचते. पचते, झेपते हे आता नवीन राहीले नाही.





वेगाने बदलणाऱ्या समाजाची अद्यावत माहिती विद्यापीठांना असते. विज्ञान-तंत्रज्ञान व ज्ञाननिर्मितीचे मुख्य केंद्र विद्यापीठ असते. ज्ञाननिर्मितीबरोबर त्याचा प्रचार व प्रसार करण्याची दूरदृष्टी, क्षमता व आवाका









विद्यापीठाचा असतो. डोळस, विवेकशील, विज्ञाननिष्ठ, जबाबदार, संवेदनशील, नीतिवान नागरिक घडविण्याची जागा म्हणजे विद्यापीठ अशी व्याख्या कृतीत आणण्यासाठी विद्यापीठाने अधिक धडपडण्याची



गरज आहे. विद्यापीठाशी संबंधित सर्वांना झोकून देण्याची गरज आहे. नवीन काही अभिनव योजना कार्यान्वित करण्याची गरज आहे. विद्यापीठांनी पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडण्याची गरज आहे. विद्यापीठांबरोबर समाज, कारखानदारी, शालेय शिक्षण इत्यादी जोडून घेण्याची गरज आहे. उमविने अनेक योजनांची आखणी केलेली आहे. या योजनांपैकी एक अत्यंत महत्त्वाची योजना म्हणजे विज्ञान विहार








(Science Park) विद्यापीठाची विज्ञान विहार उभारणीमागे अत्यंत महत्त्वाची उद्दीष्टे आहेत. विद्यापीठ ही संस्था अधिकाधिक समाजाभिमुख करणे. समाज व विद्यापीठ यांचेमधील दुरावा कमी करणे. विद्यापीठाशी संबंधित असलेला समाज म्हणजे शालेय, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षणाशी संबंधित विद्यार्थी व त्यांचे पालक. या समाजाला विज्ञाननिष्ठ बनविणे. विज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे. वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे. यासाठी विज्ञान विहारात ३-D Theatre ची उभारणी करणे, ३-D Theatre द्वारे संपूर्ण जगाच्या निर्मितीचा, केलेल्या प्रगतीचा, शिक्षण विषयक CDs, Cassettes द्वारे एक ते दीड तासाचा एक कार्यक्रम दाखविण्याची सोय निर्माण करणे. विज्ञानाशी संबंधित तंत्रज्ञान दिग्दर्शित करणारी मॉडेल्स् उभारणे, प्रत्यक्ष अनुभूतीद्वारे विज्ञानाबद्दल आवड निर्माण करणे. Planetarium उभारणे. आकाश दर्शनाची व्यवस्था करणे तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेणारे दालन उभारणे, संगणकाच्या झालेल्या विकासाची ओळख करुन देणारे दालन उभारणे, उत्तर महाराष्ट्र विभागाची सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, शेती विषयक चालीरीतींबद्दल संपूर्ण ओळख करुन देणारे दालन उभारणे, या व अशा अनेक अभिनव कल्पना साकारण्यासाठी वेगाने बदलणाऱ्या जगाला










सक्षमपणे तोंड देणारा युवक निर्माण करण्यासाठी विज्ञान विहार (सायन्स पार्क) उभारण्याची योजना आहे.


हे कार्य फार मोठे आहे. विज्ञान विहार पूर्णत्वास आणण्यासाठी खूप मोठा कालावधी व खूप मोठ्या निधीची आवश्यकता आहे. या विज्ञान विहार प्रकल्पासाठी बीज भांडवल म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने २००८–०९ च्या अर्थसंकल्पात रुपये ५७/– लाखाची तरतूद केलेली असून त्यासाठी आवश्यक ती जागा उमवि परिसरात उपलब्ध करुन दिलेली आहे. या कामासाठी भारत सरकार, महाराष्ट्र सरकार व उत्तर महाराष्ष्ट्र विद्यापीठातील तिन्ही जिल्हे, या जिल्ह्याना नेतृत्व देणारे लोकसेवक, माननीय नामदार, खासदार, आमदार, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उद्योजक, समाजसुधारक, नगराध्यक्ष, नगरसेवक, महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, बंधु–भगिनींचे सहकार्य मिळेल या खात्रीने उत्तम प्रतीचे विज्ञान विहार उभारण्यासाठीची योजना कार्यान्वित करण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु, व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्या परिषद,











विद्यापीठ विभागातील प्राध्यापक, विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील आहेत. विज्ञान विहार या संबंधात आपल्या सारख्यांच्या सूचना नक्कीच स्वागतार्ह असतील. विद्यापीठावरील आपले प्रेम व लोभ वृद्धिंगत व्हावा ही तळमळ.



## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पोष्ट बॉक्स नं. ८०, उमविनगर, जळगाव (महाराष्ट्र) भारत
फोन नं. : (०२५७) २२५८४२८, २२५८४०८, २२५८४२९,
२२५७२२१, २२, २३, २५,
फॅक्स नं. : ०२५७-२२५८४०३, २२५८४०६
ईमेल-mail: bcud_nmu@hotmail.com वेबसाईट : http://www.nmu.ac.in